# मराठी साहित्य आणि आधुनिक तंत्रज्ञान

**अर्चना रजनीकांत बाचनकर[1] & श्रीपती म रायमाने[2]**

[1]के. एल. ई. संस्थेचे जी. आय. बागेवाडी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, निपाणी. कर्नाटक.

[2]सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख, के. एल. ई. संस्थेचे जी. आय. बागेवाडी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, निपाणी.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17260017

## ABSTRACT:

आधुनिक तंत्रज्ञान हे साहित्य क्षेत्रातील एक महत्त्वाचे साधन बनले आहे. ज्यामुळे साहित्य निर्मिती, वितरण आणि वाचन या प्रक्रिया अधिक सोप्या आणि वेगवान झाले आहेत. डेस्कटॉप पब्लिशिंग पासून ते इंटरनेट पर्यंत तंत्रज्ञानाने लेखकांना नवीन व्यासपीठे दिली आहेत. वाचकांना साहित्य उपलब्ध करून दिले आहे. त्याचबरोबर साहित्याला एक नवीन स्वरूप दिले आहे. मराठी साहित्य ही महाराष्ट्रातील मराठी भाषेत रचलेली एक समृद्ध कलाकृती आहे, ज्यात लोकगीते, गद्य आणि कविता यांचा समावेश आहे. तंत्रज्ञान हे केवळ मराठी भाषेला अभिव्यक्तीचे साधन देत नाही तर, माहितीचा संग्रह, सादरीकरण, आणि प्रसारातही मदत करते. ज्यामुळे साहित्याचा विस्तार होतो.

मराठी भाषा आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचे एक अतूट नाते आहे, कारण भाषेचा विकास हा तंत्रज्ञानाच्या सहाय्याने होत जातो. तंत्रज्ञान जसे विकसित होते, तशी तशी भाषा विकसित होते. साहित्य व तंत्रज्ञान यांचे संबंध हे सर्जन व अभिव्यक्तीच्या साधनांमधील संबंध आहेत. संगणक आणि माहिती तंत्रज्ञानाच्या आधारावर भाषेचा विकास करणे शक्य आहे. मराठी भाषेच्या संदर्भात आपणास विचार करावयाचा झाल्यास, आपली भाषा ही ज्ञानभाषा होणे अत्यंत गरजेचे आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून भाषेला विकसित करणे सहज शक्य आहे.

## KEYWORDS:

मराठी साहित्य, आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल साहित्य, जागतिकीकरण, साहित्य व तंत्रज्ञान समन्वय.

मराठी साहित्य म्हणजे मराठी भाषेत निर्माण झालेले मौखिक आणि लिखित साहित्य होय. ज्यामध्ये कविता, कादंबऱ्या, लोकगीते, अभंग, पोवाडे आणि इतर अनेक प्रकारांचा समावेश असतो.

मौखिक साहित्य: मौखिक साहित्य म्हणजे बोलून किंवा गाऊन प्रसारित केले जाणारे साहित्य होय, ज्यामध्ये पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या कथा, दंतकथा, म्हणी आणि मंत्र यांचा समावेश आहे. हे साहित्य लिखित स्वरूपात नसून तोंडी परंपरेने जपले जाते आणि पिढ्यानपिढ्या हस्तांतरित होते, ज्यामुळे मराठी संस्कृती आणि परंपरेचा समृद्ध वारसा जपला जातो.

लिखित साहित्य: लिखित साहित्य म्हणजे मराठी भाषेत लिहिलेल्या कथा, कविता, कादंबऱ्या, नाटके, प्रवासवर्णने, चरित्र आणि आत्मचरित्रांसारख्या विविध प्रकारच्या रचनांचा संग्रह होय. यामध्ये अनेक नाटके आणि खंडकाव्य यांचा समावेश आहे.

आधुनिक तंत्रज्ञान: तंत्रज्ञानाला अनुकूल आपले साहित्य करण्यापेक्षा, साहित्याला अनुकूल असे तंत्रज्ञान आपण जर केले, तर साहित्य खूप प्रगतीपथावर जाणे शक्य आहे. त्यासाठी साहित्याचे लोकशाहीकरण होणे अत्यंत गरजेचे आहे. जगभरातील अनेक देशांचा अभ्यास केल्यास आपणास असे दिसून येते की, आपल्यापेक्षा कितीतरी कमी लोकसंख्या असलेल्या देशांमध्ये माहिती तंत्रज्ञानाला आपल्या साहित्यानुसार बदल करण्यास तेथील लोकांनी भाग पाडले आहे.

आधुनिक तंत्रज्ञान म्हणजे नवनवीन वैज्ञानिक शोधांचा वापर करून तयार केलेली साधने, यंत्रे, पद्धती आणि प्रणाली होय. हे तंत्रज्ञान आपल्या दैनंदिन जीवन, शिक्षण, उद्योग, शेती, आरोग्य, वाहतूक, संवाद या सर्व क्षेत्रात वापरले जाते. आजचा काळ जागतिकीकरणाचा, आधुनिक तंत्रज्ञानाच्या वाढत्या वेगामुळे संस्कृती, भाषा, व्यापार, सेवा, यांच्या देवाणघेवाणी बरोबरच विविध भाषेतील साहित्यसुद्धा सातासमुद्रापलीकडे अगदी सहज उपलब्ध होणे, सहज शक्य झाल्याचे दिसून येते. दळणवळणाच्या सोयी, परभाषेला मराठी भाषेबद्दल असणारी आत्मीयता, त्यामुळे अण्णाभाऊ साठेंचे मराठी साहित्य अनुवादाच्या माध्यमातून रशियन लोकांपर्यंत पोहोचले. आधुनिक तंत्रज्ञानामुळे सांगली जिल्ह्यातील वाटेगाव मधील अण्णाभाऊ साठे

यांच्या 'फकिरा' कादंबरीचा रशियन भाषेतील अनुवाद सहजतेने तेथील वाचकांना उपलब्ध झाला. पूर्वी पुराणग्रंथ मुखोद्गत पद्धतीने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केले जात होते. आज आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात सीडी, पेनड्राईव्ह, हार्ड डिस्क, व्हिडिओच्या माध्यमातून पुराणग्रंथांचे संग्रह संकलित केले जात आहेत. आजही अशा पुराणग्रंथांची गावोगावी पारायणे होतात. असे असले तरीही आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईलमध्ये आपल्याला भगवदगीता, ज्ञानेश्वरी, मनाचे श्लोक, एकनाथी भागवत सारखे ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यामुळे कधीही व कोठेही आज असे ग्रंथ अगदी सोयीस्कररित्या हाताळता येतात.

**साहित्य आणि तंत्रज्ञान:**

मराठी साहित्याचा दीर्घ आणि समृद्ध इतिहास आहे. पूर्वी संतांच्या अभंगापासून, शाहिरांच्या पोवाड्यांपासून, ते आधुनिक कादंबऱ्या, नाटके, आणि कवितांपर्यंत साहित्य प्रामुख्याने पुस्तकांच्या माध्यमातून किंवा रंगमंचावर अनुभवता येत असे. परंतु आज आधुनिक तंत्रज्ञानामुळे साहित्य वाचण्याची, ऐकण्याची, आणि अनुभवण्याची नवी दारे उघडली आहेत. ई-पुस्तके, ऑडिओबुक्स, ब्लॉग्स, पॉडकास्ट, यूट्यूबवरील कथा - कविता वाचन, सोशल मीडियावरची साहित्य चर्चा या मार्गांनी साहित्य थेट तरुण पिढीपर्यंत पोहोचते आहे. गुगल ट्रान्सलेट सारख्या साधनांमुळे मराठी साहित्याचे जागतिकीकरण होत असून जगभरातील वाचक ते अनुभवू शकतात. मात्र या प्रक्रियेत छापील पुस्तकांची ओढ कमी होणे, साहित्य चोरी, तसेच दर्जाहीन साहित्य प्रसार ही आव्हानेही आहेत. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करून मराठी साहित्याची परंपरा जपत नवे प्रयोग करणे ही काळाची गरज आहे.

गुगल ट्रान्सलेट, AI साधने, यामुळे मराठी साहित्य इतर भाषेत अनुवादित होते. त्यामुळे जगभर मराठी साहित्य पोहोचू लागले आहे. ब्लॉग लेखन, ई-मासिके, ऑनलाईन कादंबऱ्या, डिजिटल नाट्यरूपात एआयच्या मदतीने कविता, कथा रचनेचे प्रयोग.

**साहित्य आणि तंत्रज्ञान समन्वय:**

**भाषा तंत्रज्ञानाशी जोडली जाते.**

तंत्रज्ञान भाषेला अधिक समृद्ध आणि प्रभावी माध्यम बनवत आहे.

सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही परिणाम: तंत्रज्ञानामुळे साहित्याला नवी दिशा मिळाली असली तरी, एकाकीपणा आणि वरवरचे संबंध वाढवणे यांसारखे काही नकारात्मक परिणाम देखील जाणवत आहेत, असे काही विचारवंत मानतात.

**साहित्याच्या स्वरूपावर परिणाम:**

तंत्रज्ञानाधारित विषय: आजकाल अनेक लेखक आधुनिक तंत्रज्ञानाच्या संकल्पना, सामाजिक प्रभाव, आणि मानवी जीवनावरील त्याचा परिणाम यावर आधारित साहित्य निर्माण करत आहेत.

**निष्कर्ष:**

'आधुनिक तंत्रज्ञान आणि मराठी साहित्य' या शोधनिबंधाच्या अनुषंगाने अभ्यास केला असता, खालील निष्कर्ष नोंदविता येतात:

सामाजिक, राजकीय, आर्थिक, घटकांबरोबरच मराठी साहित्य व भाषा यावरही जागतिकीकरणाचा प्रभाव पडल्याचे दिसून येते. त्यामुळे समकालीन साहित्याचा विचार आधुनिक तंत्रांची जोड दिल्याशिवाय पूर्ण होताना दिसत नाही. विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने अभ्यासक्रमाची रचना करण्याकडे थोडाफार कल असला तरी, त्यामुळे मराठी साहित्याचे लालित्य हरवून व्यावसायभिमुख मराठी साहित्य असा ट्रेंड तर येणार नाही ना? असा प्रश्न पडून राहणार नाही.

## संदर्भ:


1. आधुनिक तंत्रज्ञान आणि मराठी भाषा : एक शोध - डॉ. भरत जाधव, डॉ. जयश्री बाबर. पृष्ठ क्रमांक 19.
2. तंत्रज्ञान आणि मराठी साहित्य - स्वाती संभाजी शिंदे. 2003.
3. बदलते मराठी साहित्य व संस्कृती सं. प्रा. विलास रणसूभे. श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर.
4. साहित्य संतृप्ती - प्रा. डॉ. श्रीपती रायमाने. सृष्टी प्रकाशन बेळगाव. 2022. पृष्ठ क्रमांक.



**Funding:**
This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**
The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.



**About the License:**
© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.